अल्केमिस्ट्री



। राजू परुळेकर

# बाळासाहेब (थोर पत्रकार) ठाकरे

'मार्मिक'च्या अंकात पत्रकारितेवर झुंडशाहीने हल्ला करणाऱ्यांचा बाळासाहेबांनी तीव्र निषेध केलेला आढळतो. पुढे 'शिवसेना' नावाची झुंड हाताशी आल्यावर ते नव्या प्रकारची पत्रकारिता शिकले.

नुकतेच वाचनात आले की, माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी पत्रकारांना उपदेश केला. बाळासाहेब ऐंशीहून जास्त वय असलेल्या ज्येष्ठ व्यक्ती आहेत. जागतिक दर्जाचे व्यंगचित्रकार आहेत. उत्तम राजकीय नेते आहेत. बरे पत्रकारही आहेत. 'साप्ताहिक मार्मिक' व 'दैनिक सामना' ही त्यांचीच अपत्ये आहेत. पैकी 'दैनिक सामना'चे संपादक असल्याने त्यांच्यावर अनेक खटलेही पडलेले आहेत. अर्थात लोकलढ्यांसाठी पत्रकारिता वापरताना न्यायालयीन खटले हे अपरिहार्यच आहेत.

परंतु बाळासाहेबांनी व्यक्त केलेले दुःख हे वेगळेच आहे. बाळशास्त्री जांभेकरांपासून ते लोकमान्य टिळकांपर्यंत सर्वांनी जी पत्रकारिता केली ती आता राहिली नाही, अशी बाळासाहेबांची खंत आहे. खरं आहे. आता ती पत्रकारिता राहिली नाही हे खरंच आहे. स्वतः बाळासाहेबांनी व्यंगचित्रकार म्हणून प्रचंड नाव व कीर्ती मिळवली होती. व्यवस्थापनासोबत मतभेद झाले म्हणून त्यांनी नोकरी सोडली. त्यानंतर 'साप्ताहिक मार्मिक'चा जन्म झाला, ज्यामध्ये बाळासाहेबांएवढाच किंबहुना जास्तच श्रमाचा वाटा श्रीकांत ठाकरे यांचा होता. स्टॅलिन सत्तेत आल्यावर सोव्हिएत रशियाच्या कम्युनिस्ट क्रांतीचा इतिहास सोयीस्कररीत्या बदलून त्यातून लेनिनच्या खांद्याला खांदा लावून लढलेल्या ट्रॉटस्कीचे नाव गायब करण्यात आले. तसे आता शिवसेनेच्या इतिहासातून आणि त्यांचा 'झेंड्याचा वसा' घेतलेल्यांकडून श्रीकांतजींचे नाव गायब करण्यात आले. (ही त्या काळची पत्रकारिता!) 'साप्ताहिक मार्मिक' हे मुळात मनोरंजनासाठी काढलेलं साप्ताहिक होतं. बाळासाहेबांच्या कुंचल्यामुळे आणि नुकत्याच होऊन गेलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामुळे 'साप्ताहिक मार्मिक' राजकीय होत गेलं. त्यातही खुद्द बाळासाहेबांपेक्षा काही वाचकांच्या पत्रांचा आणि संयुक्त महाराष्ट्राचे पंचप्राण असलेले बाळासाहेब व श्रीकांतजी ठाकरे यांचे वडील प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांचा प्रचंड प्रभाव 'सा. मार्मिक'वर होता, त्यातून बाळासाहेबांच्या आयुष्याचा रस्ताच बदलला.

बाळासाहेबांच्या आयुष्याचा रस्ता बदलला तशी त्यांची पत्रकारितेविषयीची मतेही बदलत गेली. शिवसेनेचा जन्म हा खूप नंतरचा. त्या अगोदर 'मार्मिक' साप्ताहिकात जॉर्ज फर्नांडिस व इतर प्रभृतींविषयी बाळासाहेबांनी काही लिहिले म्हणून (जवळजवळ) मोर्चासदृश गटाने संबंधित लोक बाळासाहेबांच्या घरी गेले. त्यांना बाळासाहेब सापडले नाहीत. ते प्रबोधनकारांना भेटले. (बाळासाहेब तेव्हा घरी नव्हते.) नंतरच्याच 'मार्मिक'च्या अंकात पत्रकारितेवर अशा झुंडशाहीने हल्ला केलेल्यांचा बाळासाहेबांनी तीव्र निषेध केलेला आढळतो. ही काही पत्रकारांशी वागण्याची पद्धत नव्हे, अशी बाळासाहेबांनी मतं व्यक्त केलेली होती. नंतर पुढे 'शिवसेने'ची स्थापना झाली. 'पत्रकार' बाळासाहेबांच्या हाताशी आयते मनुष्यबळ उपलब्ध झाले. ज्यांनी संयुक्त महाराष्ट्र घडवण्यात व मुंबई महाराष्ट्रात आणण्यात केवळ लेखणीने आणि 'मराठा'च्या पत्रकारितेने अख्ख्या भारतीय सरकारला आणि जवाहरलाल ते मोरारजींना आव्हान दिलं ते आचार्य अत्रे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ते अतिशय लाडके होते. महान पत्रकार होते. त्यांच्याशिवाय मराठी भाषा आणि मुंबई महाराष्ट्रात येण्याचा इतिहास पूर्ण होणं शक्यच नव्हतं. बाळासाहेबांनी शिवसेनेची कुमक हातात येताच पत्रकार म्हणून आचार्य अत्र्यांना 'वरळीचे डुक्कर' म्हणायला सुरुवात केली आय मीन लिहायला सुरुवात केली. आचार्य अत्र्यांकडे संघटना नव्हती, पण ते एक बेडर पत्रकार, लेखक, विद्वान, वक्ते, चित्रपट निर्माते व शिक्षणतज्ज्ञ होते. पुण्याच्या एका सभेत (मला वाटतं १९४२ साली) सावरकरवाद्यांनी त्यांना रक्तबंबाळ होईस्तोवर मारलं होतं. तरी त्यांनी शांतपणे मार खाऊन नंतर रक्त अंगावरून ओघळत असताना भाषण पूर्ण केलं. त्यांचं ते अप्रतिम भाषण होतं (as usual). त्यांच्यावर नंतर 'अहिंसेचा खरा पुजारी' असा लेखही महात्मा गांधींनी 'हरिजन'मध्ये लिहिला होता. या संयुक्त महाराष्ट्राच्या महायोद्धा 'कर्णाला' त्याच्या योग्यतेचा मान महाराष्ट्राने कधीच दिला नाही. पण पत्रकार बाळासाहेब ठाकरेंनी अत्र्यांच्या उतारवयात त्यांना 'वरळीचे डुक्कर' असे संबोधून नंतर शिवसेनाप्रमुख म्हणून ठाण्याच्या अत्र्यांच्या सभेत गुंड घुसवून त्यांची गाडी फोडली, त्यांना धक्काबुक्की केली, सभा उधळली. 'पत्रकारांवर झुंडशाहीने हल्ला न करावा' असे शिवसेनाविनाचे हे बाळासाहेब ठाकरे शिवसेना नावाची 'झुंड' हाताशी आल्यावर नव्या प्रकारची पत्रकारिता शिकले होते. ती बाळशास्त्री जांभेकर ते लोकमान्य टिळकांचा वारसा सांगणारी होती का?

बाळासाहेबांचं आत्ताचं वय ऐंशीहून अधिक आहे. तरीही त्यांची विजिगीषु वृत्ती आणि लढण्याचा बाणा कायम आहे, असं उद्धव ठाकरे वारंवार महाराष्ट्राला सांगतात. पण जी लढाई पत्रकारांनी लढावी असं

बाळासाहेबांना वाटतं ती लढण्याकरिता टिळक, भगतसिंहसारखं असामान्य धैर्य अंगी लागतं. टिळक प्लेगच्या साथीने मुलगा गेल्यावर ''गावात होळी पेटल्यावर आपल्या घरच्या चार गोवऱ्या जाणारच,'' असं म्हणाले होते. भगतसिंह तर फासावर अगोदर जाण्यासाठी राजगुरू आणि सुखदेव यांच्याशी तुरुंगात भांडला होता. त्या तिघांनी पत्रकार म्हणून भरपूर लेखन केले आहे. (विशेषतः भगतसिंहाने) ते विशी-बाविशीत देशासाठी फासावर आधी कोण जाणार यासाठी भांडत होते. चंद्रशेखर आझाद जाड असल्यामुळे हे इतर क्रांतिकारी सहकारी त्यांना जाडीमुळे फासाचा दोर पुरणार नाही असं विनोदाने (!) चिडवत, तर आझाद त्यांना फासावर जाण्यासाठी शुभेच्छा देत आणि म्हणत की, मला माझ्या गोळ्याच (पिस्तूलच्या) प्रिय आहेत. शेवटी आझाद ब्रिटिश अधिकाऱ्यांना गोळ्या घालत घालत शहीद झाले ते गोळ्यांनीच! एका अग्रलेखासाठी टिळक मंडालेला सहा वर्षं सजा भोगत होते. तिथे नंतर शिक्षा भोगायला सुभाषचंद्र बोस शिक्षा झाल्यामुळे गेले. त्यांनी टिळकांना जिथे सजा झाली तिथे स्वतःला सजा झाल्यामुळे स्वतःचा सन्मान झाला असे उद्गार काढले.

बाळासाहेबांचा आणि सुभाषबाबूंचा वाढदिवस एकाच दिवशी येतो- २३ जानेवारी. सुभाषबाबूंनी जे लेखन केलं, भाषणं केली ती अंतःप्रेरणेतून. ते जे बोलले, त्यांनी जे लिहिलं त्याला ते जागले. तसंच ते जगले. भूमिकांबाबत कधीच कोलांट्या उड्या मारल्या नाहीत. आपली भूमिका नि गांधीजींच्या भूमिकेत मतभेद दिसताच निवडून आलेले असतानाही त्यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला नि देश सोडून 'खरीखुरी' सेना उभी केली. शिवाय भाषेमध्ये गांधींबद्दल कटुता, द्वेष वा असंस्कृतपणा येऊ दिला नाही ते वेगळंच.

महान पत्रकारितेच्या गोष्टी या महापुरुषांनी कराव्यात. अर्थात लोकशाहीत बाळासाहेबांनाही चार गोष्टी आम्हाला शिकवायला हरकत नाही. पण ही लोकशाही ते 'दळभद्री' मानतात त्याला आपण काय करणार? मग गोंधळ उडतो. पत्रकारांनी काय करावं? लोकशाही की ठोकशाही? अंतःप्रेरणेने घेतलेले निर्णय आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत पुढे न्यावेत की भूमिकांवर कोलांट्या उड्या माराव्यात? पत्रकारांचा याबाबतीतला बाळासाहेबांनी गोंधळ



दूर करण्याकरिता त्यांच्या कार्यशाळा घ्याव्यात.

बाळासाहेबांनी 'सामना' हे वृत्तपत्र काढले. त्याचे ते संपादक आहेत. नव्वदच्या दशकात त्यांनी हिंदुत्वाची कास धरली. १९७३ साली महापालिका निवडणुकीत बाळासाहेबांनी मुस्लिम लीगशी हातमिळवणी केली होती, त्याचे फोटो त्यांच्या फोटोबायोग्राफीत उपलब्ध आहेत. मशिदीत नमाज पढायला जातानाचा, चांद-ताऱ्याच्या पोडियमचा वापर करतानाचा, असे हे फोटो आहेत. हिंदुत्वाची कास धरल्यावर पत्रकार बाळासाहेबांना 'हिंदुहृदयसम्राट' ही उपाधी त्यांच्या भोवतीच्या मंडळींनी दिली. तेव्हा बाळासाहेबांची क्रेझ महाराष्ट्रात पसरली होती. तेव्हा त्यांच्या मतांशी सुसंगत नसलेली मतं काही वृत्तपत्रांत छापून आली. बाळासाहेबांच्या पत्रकार परिषदेत आणि नंतर औरंगाबादेत अनेक पत्रकारांना ठोकून काढण्यात आलं. काही पत्रकार मार टाळण्यासाठी झाडाला लटकले होते. काही गटारीत लपले होते. बरेचसे मार खात पळत होते. उरलेल्यांनी सुरक्षित अंशी बाळासाहेबांशी सुसंगत अशी भूमिका घेऊन आयोडेक्स आणि सोफ्रामायसिन, आयोडीनचा खर्च वाचवला. त्यावर सरकारने 'तू मारल्यासारखे करतो, मी रडल्यासारखे करतो' असा आयोग नेमला. त्याने पत्रकार बाळासाहेबांना ते हिंदुहृदयसम्राट असल्याने निर्दोष सोडले.

मी जन्मालाही आलो नव्हतो तेव्हा शिवसेनेची स्थापना झाली. गेली वीस वर्षं मी बाळासाहेबांचा (इतर अनेकांचा करतोय तसा) अभ्यास करतोय, पण त्यांच्या दृष्टीने (स्वार्थ वगळता) आदर्श काय आहे तेच मला कळत नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागायचे ठरवले तर दुसऱ्याच दिवशी गोची होते. एकेकाळी पत्रकार बाळासाहेबांनी 'घराणेशाही' विरुद्ध इंदिराजींविरुद्ध झोड उठवली होती. आज मी तो आदर्श लेखक म्हणून ठेवला तर? मराठी मग हिंदुत्व! मग त्यांचा दाऊद तर आमचा गवळी! हिंदुत्वाची फेडेड जीन्स झाली मग पुन्हा मराठी!

बाळासाहेबांच्या स्वप्नातली आदर्श पत्रकारिता करण्याची खूप इच्छा आहे. पण म्हणजे नेमकं काय? तेच कळत नाही. म्हटलं आपल्या बाजूने आपण कमी पडू नये. याचं भान ठेवत पत्रकार बाळासाहेबांना, 'सामना'च्या संपादक बाळासाहेबांना दोन विनंत्या करतो. टिळक, जांभेकरांसारखी सडेतोड पत्रकारिता आणि खऱ्या पुनर्वसन झालेला मराठीचा मुद्दा जमेला धरून त्याच्याशी सुसंगत अशी एक फाईल 'सामना'त पोचलेली आहे. नसेल तर नेटवर 'गुगल'वर अरुण देवांनी मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष आमदार कृपाशंकरसिंह (उर्फ शिवसेना नगरसेवक संजय पोतनीस यांचे अप्रत्यक्ष पार्टनर) यांची मधु कोडा प्रकरण, स्वतः व पत्नी यांची दोन पॅनकार्डस्, मालमत्ता, त्यांची खरी-खोटी बी.एस्सी. डिग्री, दिवाण बिल्डरकडून प्राप्त केलेली संपत्ती याचा सारा तपशील त्या फाईलमध्ये (व गुगलवरही आहे) 'सामना'मार्फत टिळक, जांभेकरी पत्रकारितेच्या आदर्शानुसार ही संपूर्ण फाईल सार स्वरूपात छापावी. मराठी माणसांचे 'प्रबोधन' होईल. शिवाय हिटलर म्हणाला होता, Fate does not spare the man whose convictions are not matched by his readiness to give them effect! ज्या माणसाचं वर्णन त्याच्या अंतःप्रेरणेशी सुसंगत नसतं, नियती त्याला क्षमा करीत नाही.) बाळासाहेबांचे अनुयायी त्यांना प्रति हिटलर मानत. त्या अर्थानेही हे सुसंगत होईल.

हे जर अगदीच जमणार नसेल तर निदान त्याची तर्कशुद्ध कारणे तरी 'सामना'त मराठी माणसासाठी छापावीत आणि टिळक, जांभेकरांचं नाव घेऊन उपदेश कुणीही मन्या, पक्या देऊ शकतो.

हिंदुहृदयसम्राट, पत्रकार, शिवसेनाप्रमुख थोर आहेत. आम्ही त्यांच्यासमोर पोर आहोत. पण पोर माणसं थोरांकडून अपेक्षाही थोर करतात. टिळक, जांभेकर यांच्यासारखी पत्रकारिता साहेबांनी थोडी आम्हास शिकवावी म्हणून कृपाशंकरसिंहाचा स्वाध्याय आम्ही अभ्यासाला घेऊ इच्छितो.

✉ raju.parulekar@gmail.com